निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि – 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

## प्रसिद्धीसाठी

## बँक ऑफ महाराष्ट्रकडून कर्जाच्या कालचक्र व्यवस्थापनाच्या प्रणालीचे विकसन

पुणे दि. २८ ऑगस्ट २०२० : देशातील सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य बँक ऑफ महाराष्ट्रने व्यवसायांसाठी कर्जाच्या संपूर्ण मुदतीच्या व्यवस्थापनाची प्रणाली (एल एल एम एस) विकसित केली आहे. यामुळे कर्जमंजुरी स्वयंचलित होणे हा व्यवसायात रुपांतर घडवणारा बदल आहे. बँकेचे कर्जवितरण डिजिटल करण्याच्या बँकेच्या उपक्रमातील हा महत्त्वाचा टप्पा आहे. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व प्रमुख कार्यकारी अधिकारी श्री. ए एस राजीव यांनी बँकेच्या प्रमुख कार्यालयामध्ये ही प्रणाली संचालित केली.या प्रणालीच्या उद्घाटन प्रसंगी बँकेचे कार्यकारी संचालक श्री. हेमंत टम्टा व श्री. नागेश्वर राव वाय, तसेच बँकेच्या प्रमुख कार्यालयातील सरव्यवस्थापक व इतर कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. राजीव यांनी सांगितले की या प्रणालीमुळे कामकाजाचा खर्च कमी होईल, कर्जाच्या प्रक्रियेमधील वेळेची बचत होईल, कर्ज प्रकरणांच्या छाननीचा दर्जा सुधारेल आणि ग्राहक संपर्क वाढून कर्ज वितरणातील अडचणी दूर होतील यापुढे बँकेचे ग्राहक त्यांची कर्ज मागणी ऑनलाईन पद्धतीने करू शकतील व त्यांना त्यांच्या अर्जाचा मागोवा रिअल टाईममध्ये घेता येईल.